CNR NO - MHCH090002652024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १३.०३.२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १३.०३.२०२४ |
| निकाल दिनांक | : | ०८.०७.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०३ २५ |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर

(पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)

सं.फौ.प्र.क्र. २०५/२०२४ निशाणी क्र.२१

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन गोंडपिपरी,
ता. गोंडपिपरी, जिल्हा. चंद्रपूर ....अभियोगपक्ष

-विरुध्द-

हरमेलसिंग रणजितसिंग डांगी,
वय- ३९ वर्षे, व्यवसाय – मजुरी
रा. जोगापूर, ता. गोंडपिपरी,
जि. चंद्रपूर

......आरोपी

गुन्हाः महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ **(ई)** अन्वये

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर.बी.धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. आर.एम.कांबळे

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक ०८ जुलै, २०२६ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र./३३०/२०२३ पोलीस स्टेशन, गोंडपिपरी ता. गोंडपिपरी येथे नोंदवून तपास श्री. गोकुलदास मडावी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.११ वर नोंदविला. आरोपीने

प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. १८/११/२०२३ रोजी १८.०० ते १८.४५ वाजताचे दरम्यान मौजा जोगापूर, ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर येथे आरोपी याचे ताब्यात २२१ नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारू विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असतांना मिळून आली ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

<u>का र ण मि मां सा</u>

०५. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंच सा.क्र.१ दिलीप भिवाजी गुरनुले व तपासी अधिकारी सा.क्र.२ गोकुलदास बाबुराव मडावी यांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांचा साक्षपुरावा नोंदविण्यास असमर्थ ठरला. करीता, <u>नि.क्र.१</u> वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-

०७. साक्षदार क्र.१ दिलीप भिवाजी गुरनुले हे पंच साक्षिदार असून त्यांनी सरतपासादरम्यान पोलीसांनी घटनास्थळावर त्यांच्या समक्ष पंचनामे तयार केलेले असल्याचे कथन केलेले आहे. परंतु, त्यांनी उलटतपासादरम्यान ते जोगापूर गावचे पोलीस पाटील असल्याचे, त्यांना शासकीय भत्ता मिळत असल्याचे, पोलीस अधिकारी त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे, त्यांनी अनेक खटल्यामध्ये यापुर्वी साक्ष दिल्याचे, पोलीसांना सहकार्य करणे हे त्यांचे काम असल्याचे, आरोपीच्या घरापासुन त्यांचे घर लांब असल्याचे व आरोपीच्या घराला लागुन इतर राहते घर असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच, त्यांनी यापुर्वी अनेक प्रकरणांमध्ये साक्ष दिलेली आहे. त्यांनी इतर सुचक प्रश्न नाकारले. सदरचे साक्षीदार हे नेहमीचे साक्षीदार असल्यामुळे पोलीसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा तयार केला होता, ही बाब त्यांच्या साक्षेवर संशय निर्माण करणारी आहे.

**०८.** साक्षदार क्र.२ गोकुलदास बाबुराव मडावी तपास अधिकारी यांना तपासी अधिकारी या नात्याने तपासण्यात आलेले असून, त्यांनी पुराव्यादरम्यान साक्षिदारांचे बयाण नोंदविले असल्याचे व दोषारोपपत्र दाखल केल्याच्या बाबी कथन केलेल्या आहेत. त्यामुळे, त्यांचा साक्षपुरावा हा त्यांच्या कर्तव्यास अनुसरून असलेला दिसून येतो. करीता, त्यांच्या साक्षपुरावा हा आरोपींविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही.

**०९.** अभिलेखावरील साक्षीदारांच्या साक्षेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र. १ या पंच साक्षीदार असून त्यांच्या उलटतपासात त्यांनी ते जोगापूर गावचे पोलीस पाटील असल्याचे, त्यांना शासकीय भत्ता मिळत असल्याचे, पोलीस अधिकारी त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे, त्यांनी अनेक खटल्यामध्ये यापुर्वी साक्ष दिल्याचे, पोलीसांना सहकार्य करणे हे त्यांचे काम असल्याचे, आरोपीच्या घरापासुन त्यांचे घर लांब असल्याचे व आरोपीच्या घराला लागुन इतर राहते घर असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदरचे साक्षीदार हे पोलीसांचे नेहमीचे साक्षीदार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे केवळ सदर साक्षीदाराच्या साक्षवरून सदरचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला किंवा संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही. सा.क्र.२ श्री. मडावी यांचा साक्षपुरावा औपचारीक स्वरूपाचा आहे. त्यामुळे घटनास्थळ व जप्त पंचनामे पुर्णपणे सिद्ध झाले असे म्हणता येणार नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ:करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारूच होती ही बाब सिद्ध झालेली आहे. परंतु, सदरहू दारू ही आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली होती, ही बाब पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकली नाही. तसेच जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेऊन जाणारा कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी हा स्वतःजवळ अवैधरित्या दारू बाळगून असतांना मिळून आला होता, ही बाब सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**१०.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

आदेश

१. आरोपी हरमेलसिंग रणजितसिंग डांगी याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एकुण २२१ नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट देशी दारू संत्रा विल्हेवाटीकरीता आवाहनाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर येथे पाठविण्यात यावी.

**३.** आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

**४.** आरोपीने रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन फौजदारी प्रकिया संहिता चे कलम ४३७-अ अन्वये पुर्तता करावी.

**(**न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला**.**)

(Sd-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी

स्थळ :- गोंडपिपरी
दिनांक :- ०८/०७/२०२६